# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### अमरावती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत

**(१) ११४४ (२२-१२-२०१४). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा परिषद मधील प्राथमिक शिक्षक अतिरिक्त असल्याने जिल्ह्याअंतर्गत आंतरजिल्हा बदलीचे प्रकरणास मान्यता देऊनही सदर शिक्षकांना सामावून घेतले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षकांचे बदली प्रकरण मान्यता कालावधी विचारात घेऊन त्यांचे समायोजन करण्याबाबत शासनाने संबंधितांना आदेश देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१२-२०१५)** :(१), (२) व (३) जिल्हा परिषद, अमरावती कडे काही प्रकरणी प्राप्त झालेल्या आंतरजिल्हा बदली प्रस्तावाचे अनुषंगाने प्रस्तावाची पडताळणी करुन प्रवर्ग निहाय रिक्त असलेल्या पदी जेष्ठतेनुसार जिल्हा परिषदे मार्फत पदस्थापना आदेश निर्गमित करण्यात आले होते. तथापि, संबंधित जिल्हा परिषद प्रशासनाने जिल्हा बदलीचे कर्मचाऱ्यास (सहाय्यक शिक्षक) विहीत मुदतीत पदस्थापनेच्या ठिकाणी (जिल्हा परिषद, अमरावती) रुजु होणेस्तव कार्यमुक्त केले नाही. सद्यस्थितीत बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतूदीनुसार सलग वर्षी शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरत असल्याने जिल्हा बदलीने पदस्थापना दिलेल्या शिक्षकांना जिल्हा परिषद अमरावतीमध्ये सामावून घेणे शक्य झाले नाही.

तसेच जिल्हा परिषद स्तरावर सद्यस्थितीत बिंदुनामावली अद्यावत करण्याची कार्यवाही सुरु असून संचमान्यता व बिंदुनामावली अंतिम झाल्यानंतर आंतर जिल्हा बदली प्रस्तावावर कार्यवाही करणे शक्य होईल.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील १९ आयुर्वेदिक दवाखाने कार्यरत असून १६ ठिकाणी वैद्यकीय अधिका-यांच्या जागा रिक्त असल्याबाबत**

**(२) ९३३९ (०८-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील १९ आयुर्वेदिक दवाखाने कार्यरत असून तब्बल १६ ठिकाणी वैद्यकीय अधिका-यांच्या जागा रिक्त असल्याचे माहे, डिसेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जागा रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, रिक्त जागा भरण्याकरिता शासन कोणती कार्यवाही केली वा करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१०-०३-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. कोल्हापूर जिल्ह्यात १६ आयुर्वेदिक दवाखाने असून सदर दवाखान्यात गट-ब वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या १६ मंजूर पदांपैकी ६ पदे भरलेली असून १० पदे रिक्त आहेत.

(२) व (३) आरोग्य विभागात गट-अ संवर्गात एकूण ७,२०० वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर आहेत, यापैकी ९८५ पदे रिक्त असल्याने गट-ब संवर्गातील अनेक वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत आहेत, सदर रिक्त पदे भरण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. मागील वर्षात १,३५१ वैद्यकीय अधिकाऱ्यांना गट-अ मध्ये नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. यापैकी १,२२३ वैद्यकीय अधिकारी हजर झाले आहेत. गट-अ मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे पुरेशा प्रमाणात भरल्यानंतर गट-ब संवर्गातील वैद्यकीय अधिकारी आयुर्वेदिक दवाखान्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील.

---

**बुलढाणा जिल्हयातील मलकापूर मतदारसंघातील नांदूरा तालुक्यातील जिगांव सिंचन प्रकल्पातील बाधीत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३) १०८११ (०४-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील मलकापूर मतदारसंघातील नांदुरा तालुक्यातील जिगांव सिंचन प्रकल्पातील बाधीत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन रखडले असून यासह इतर अनेक प्रश्न अद्यापही मार्गी लागले नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदुरा तालुक्यातील शेतक-यांच्या जीवन -मरण्याचा प्रश्न असलेल्या व अत्यंत महत्त्वपूर्ण समजल्या जाणा-या जिगांव प्रकल्पांतर्गत गाव नमुना ८, विभक्त रेशनकार्ड वितरण, खरेदी-विक्री व्यवहार, गावठाण प्रश्न, नवीन भूसंपादन व पुनर्वसन कायद्याप्रमाणे लाभ आदी सर्व प्रश्नांवर प्रशासनाच्या कामाची निर्णय घेण्याची गती संथ आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पूर्वीच्या ३५० कोटी रूपयांचा हा प्रकल्प प्रशासनाने पूर्ण करण्यास विलंब लावल्यामुळे प्रकल्प ५००० कोटी रूपयांपर्यंत पोहचला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, धरणाच्या माती भिंतीची काम पाहता पुनर्वसनाची गती शून्य आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जिगांव प्रकल्पाच्या पुर्णत्वासाठी शासनाचे पुढील नियोजन काय व कसे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०३-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही. तहसिलदार, नांदुरा यांच्यामार्फत गावनिहाय वेळापत्रक तयार करुन विभक्त रेशनकार्डाचे वाटप करण्यात येत आहे. तसेच लाभक्षेत्रातील खरेदी-विक्रीचे व्यवहार कलम १२(२)नुसार संपदान पात्र जमिन राखीव ठेवून उर्वरीत जमीनीचे व्यवहार वि.अपर जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने सुरु आहे. गाव नमुना ८ अ च्या वारसा हक्काच्या नोंदीबाबत निर्बंध नाहीत
(३) अंशत: खरे आहे. प्रकल्पाची प्र.मा.रु.६८९.५० कोटी (दरसूची १९९४-९५) व अद्यावत मंजूर सुप्रमा किमत रु.४०४४.१४ कोटी आहे. परंतु प्रकल्पाचे किंमतीतील वाढ ही दरसुचीतील बदल, भुसंपदानाचे किंमतीतील वाढ इ.प्रमुख कारणांमुळे झाली आहे.
(४) नाही. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन गावठाणासाठी २३२.७४ हेक्टर संपादित करण्यात आली आहे या जमिनीवर १० प्रकल्पबाधीत गावठाणांचे पुनर्वसन करण्याचे नियोजीत आहे.
(५) प्रकल्पाचे काम ५ टप्प्यात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. प्रकल्पाचे पहिल्या टप्प्याचे काम जून १९ पर्यंत व प्रकल्पाचे संपूर्ण काम जून, २३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(६) निधीची मर्यादित उपलब्धता नविन भूसंपादन कायदा २०१३ नुसार बहुतांश भूसंपादन प्रकरणात नव्याने भूसंपादनाची कार्यवाही सुरु करावी लागणे इ. कारणांमुळ विलंब होत आहे.

---

## आकोट (जि.अकोला) येथील शहापूर पाटबंधारे प्रकल्प गेल्या दहा वर्षापासून रखडला असल्याबाबत

**(४) १३५४० (०८-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आकोट (जि.अकोला) शहापूर लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम सन २००५ मध्ये सुरु होऊन ते २००८ मध्ये पुर्ण होणे अपेक्षित होते परंतु गेल्या दहा वर्षात आजपावेतो हे काम पूर्ण होऊ शकले नाही तसेच धरणाचे काम कंत्राटदाराने ६० टक्के पर्यंत केले, उर्वरीत काम अद्याप झाले नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे या भागातील भुगर्भातील पाण्याची पातळी खोल गेली असुन सिंचन विहिरी बंद पडल्या आहेत, बोअरवेल पाण्याची पातळी २०० फुटच्या खाली गेली आहे सिंचन प्रकल्पाशिवाय या भागात सिंचनाचा पर्याय उरला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रलंबित प्रकल्पाच्या कामाबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी प्रकल्प कोणत्या तांत्रीक अडचणीमुळे रखडला त्याबाबत अद्याप कोणती कार्यवाही पूर्ण झालेली आहे
(५) नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच प्रकल्प पूर्ण करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१६) :**(१) होय.
(२) अंशत: खरे आहे. भूजलाच्या अतिवापरामुळे पाण्याची पातळी खोल गेली आहे. सिंचन प्रकल्प हा सिंचनाचा एकमेव पर्याय नसुन भू-जल पुनर्भरणाची कामेसुध्दा सदर भागात उपयुक्त ठरु शकतील.
(३), (४) व (५) नाही, तथापि, कंत्राटदाराची प्रकल्प कामामध्ये आवश्यक प्रगती नसल्याने व दि.२२/६/२००९ पासुन कंत्राटदाराने काम बंद ठेवल्याने, दिनांक ३/३/२०११ रोजी कलम -३ (क) अंतर्गत प्रकल्पाचे काम कंत्राटदाराकडून काढुन घेण्यात आले आहे. या कार्यवाहीचे अनुषंगाने कंत्राटदाराने मा.न्यायालयात प्रकरण दाखल केले होते. दि.२२/९/२०१५ पर्यंत न्यायालयीन कार्यवाहीमुळे कामात पुढे प्रगती होऊ शकली नाही. आता धरणाचे उर्वरीत मातीकाम १९ नोव्हेंबर, २०१५ पासुन यांत्रिकी विभागामार्फत सुरु करण्यात आले आहे. मुख्यविमोचक, निचरा नाली, रॉक टो, इत्यादी कामांसाठी निविदा नव्याने निश्चित करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील श्रीक्षेत्र भिमाशंकर हे १२ ज्योतिलिंग येथे भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करण्याबाबत

**(५) १८४६४ (१०-०८-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील श्रीक्षेत्र भिमाशंकर हे १२ ज्योतिर्लिंगापैकी सहावे असून याठिकाणी दर्शनासाठी येणा-या भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी भिमाशंकर विकास आराखडा तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र सरकारने या परिसरातील १३० चौरस किलोमीटर परिसर अभयारण्य म्हणून घोषित केल्याने रस्ते वाहतूक व्यवस्था, विद्युतपुरवठा, यात्रेकरू निवास, आरोग्य केंद्र,

पोलीस चौकी व पिण्याच्या पाण्याच्या सोई इ.मुलभूत सुविधा वन विभागाच्या जाचक अटीमुळे विकास कामे करता येत नाहीत, असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र सरकारकडे विकास आराखड्यानुसार कामे करण्यात येणा-या अडचणी दूर करण्याचे दृष्टीने शासनाने आतापर्यंत कशाप्रकारे पाठपुरावा केला आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-१०-२०१५) :**(१), (२) व (३) नियोजन विभागाच्या दि. २३.११.२०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार श्रीक्षेत्र भिमाशंकर जि. पुणे विकास आराखडयास मान्यता देण्यात आलेली आहे. आराखडयानुसार मंजूर असलेल्या रस्त्याच्या कामासाठी वन जमिन मागणी प्रस्ताव कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांनी वन विभागाकडे दि. १२.०७.२०१५ रोजी वनविभागाच्या संकेतस्थळावरुन सादर केला असून वन विभागाच्या शेऱ्याची पूर्तता करुन १०.०९.२०१५ रोजी मंजूरीसाठी फेरसादर केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### रत्नागिरी जिल्हयाच्या ग्रामीण भागातील साकव धोकादायक स्थितीत असल्याबाबत

**(६) १९५८५ (१९-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयाच्या ग्रामीण भागातील ५९७ साकव मोडकळीस आले असून ते धोकादायक स्थितीत असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर साकवांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजनाकडे निधीची तरतूद नसल्याने गेली दोन वर्षे दुरुस्तीचा प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर साकवांची दुरुस्ती न झाल्यामुळे शेकडो गावांचा संपर्क तुटण्याची भिती व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) तसेच, तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :**(१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

(४), (५) व (६) सन २००२-०३ पूर्वी जिल्हा परिषदांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून साकव दुरुस्तीसाठी ३०५४ मार्ग पूल परिरक्षण व दुरुस्ती या योजनेतर संवर्गाखाली साकव दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध होत होता. परंतु सन २००२-२००३ पासून संवर्ग अ ब क ड मध्ये साकव ही बाब अंतर्भूत होत नाही.

सन २०१२-१३ या वर्षापासून जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांची देखभाल दुरुस्ती हा योजनेत्तर कार्यक्रम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ग्राम विकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे.

शासन निर्णय दि १०.९.२०१२ अन्वये जिल्हा परिषदेमार्फत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग या रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीकरीता निधीचे वाटप करण्याबाबत कार्यपध्दती विशद केली आहे. त्यानुसार या योजनेत्तर कार्यक्रमासाठी गट अ ब क ड तयार केले असून गट ड मधील अन्य व संकिर्ण कार्यक्रम अंतर्गत जिल्हा परिषदेने साकव  दुरुस्तीचे काम करण्याचे नियोजन करणे अपेक्षित आहे.

संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामणी मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार रत्नागिरी जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८०८५.३५ कि.मी इतकी आहे. रस्ते व पूल, दुरुस्त व परीक्षण या कार्यक्रमाअंतर्गत  सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेस एकूण रु.३७३३.८२ लक्ष, तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१२-२०१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये एकूण रु ७६३.५८ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेला रु.१७००.६३ लक्ष असा एकूण रु.६१९८.०३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

---

**कलोते (ता.खालापूर जि.रायगड) धरणाचे पाणी अडविण्यासाठी बांधलेल्या दगडी भिंतीची झालेली दुरवस्था**

**(७) १९७९३ (१४-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कलोते धरणाला (ता. खालापूर, जि.रायगड)  ठिकठिकाणी तडे गेले असून धरणाचे पाणी अडविण्यासाठी बांधलेल्या दगडी भिंतीची दुरवस्था झाली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणाची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी तेथील नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या धरणाची तातडीने दुरुस्ती करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१६) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोरवड-लखमापूर (जि.लातूर) या साठवण तलावासाठी शेतकऱ्यांच्या संपादित जमीनीचा वाढीव मावेजा देण्याबाबत**

**(८) २१०४२ (१४-०८-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरवड-लखमापूर साठवण तलाव (जि.लातूर) या साठवण तलावासाठी शेतकऱ्यांच्या संपादित जमीनीचा वाढीव मावेजा देण्याबाबत मा.जिल्हा न्यायालयाने दोन वर्षापूर्वी आदेश देऊनही संबंधीत शेतकऱ्यांना अद्यापही संपादीत जमीनीचा वाढीव मावेजा देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना भुसंपादनाचा वाढीव मावेजा देण्याबाबत विलंबाची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांचा वाढीव मावेजा देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे तसेच सदर शेतकऱ्यांना मावेजा देण्याबाबत शासनास किती कालावधी लागेल ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मोरवड साठवण तलावाच्या मूळ निवाड्यावर वाढीव मावेजासाठी मौ.मोरवड, लखमापूर, ता.रेणापूर या सात गावातील शेतकरी जिल्हा न्यायालयात गेल्यामुळे जिल्हा न्यायालयाचे एकूण भूसंदर्भ १० असून एकूण ८१ प्रकणांमध्ये आदेश आहेत. यापैकी एक प्रकरणांत मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये रु. १४.३५ लक्ष जमा करण्यात आलेले आहेत. तसेच १ भूसंदर्भ प्रकरणातील ४ प्रकरणात निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच १ भूसंदर्भ संचातील २० प्रकरणे मा. उच्च न्यायालयात सुनावणीसाठी प्रलंबित आहेत. उर्वरित प्रकल्पाबाबत उच्च न्यायालयात अपील करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. मा.उच्च न्यायालयाच्या अंतरीम आदेशानुसार वाढीव मावेजा जमा करण्याची कायवाही करण्यात येईल.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील जलपूर्ती विहीरी योजनांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(९) २१६७१ (१७-०८-२०१५). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील धडक जलपूर्ती विहीरी योजनेत सन २०१३-२०१४ सन २०१४-२०१५ मध्ये किती लाथार्थ्यांना विहीरी पूर्ण केल्या आहेत,

(२) असल्यास, यापैकी किती शेतकऱ्यांनी विहीरी पूर्ण केलेल्या आहेत, पूर्ण केलेल्या विहिरीचे देयके संबंधित शेतकऱ्यांना अदा करण्यात आले आहेत काय,

(३) असल्यास, अपूर्ण असलेल्या विहिरींची संख्या किती व अपूर्ण असल्याची कारणे काय,

(४) असल्यास, विहीरी पूर्ण करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०३-२०१६) :**(१) धडक सिंचन विहीर योजनेमध्ये पंचायत समिती खामगाव अंतर्गत सन २०१३-१४ मध्ये ३२५ व सन २०१४-१५ मध्ये ९१ विहिरी अशा एकूण ४१६ विहिरी पूर्ण करण्यात आल्या आहेत.
(२) एकूण ४१६ शेतकऱ्यांनी विहिरी पूर्ण केल्या असून त्यांना विहिरींची देयके अदा करण्यात आली आहेत.
(३) खामगाव तालुक्यात १३९ विहिरी अपूर्ण असून लाभार्थ्यांनी वेळेवर कामे पूर्ण न केल्याने त्या विहिरी अपूर्ण आहेत.
(४) १३९ विहिरींपैकी १२७ विहिरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत वर्ग करण्यात आल्या असून विहीरींची कामे सुरु आहेत. ९ इतर लाभार्थ्यांच्या विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत ३ लाभार्थ्यांच्या विहिरी नरेगात वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील बहुतांश योजना केंद्र व राज्य शासनाच्या**
**संयुक्त अनुदानातून कार्यरत असल्याबाबत**

**(१०) २२३७७ (१५-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बहुतांश योजना केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त अनुदानातून चालतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मानव विकास निर्देशांक कमी असलेल्या राज्यातील बारा जिल्ह्यांत २००७ पासून मागास क्षेत्र अनुदान निधी (बीआरजीएफ) योजना सुरु असून केंद्राच्या निर्देशानुसार ही योजना ३१ ऑगस्टपासून बंद होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे त्यातील ४८३ कर्मचा-यांवर बेरोजगारीचे संकट ओढवणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त कर्मचा-यांच्या भवितव्याबाबत शासन काही उपाययोजना करणार आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०९-२०१५) :**(१) राज्यातील काही योजना केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त अनुदानातुन चालतात, हे खरे आहे.
(२) सदरची योजना ही ग्राम विकास विभागांतर्गत असून १००% केंद्र पुरस्कृत योजना असल्यामुळे सन २०१४-१५ पर्यंत १००% निधी हा केंद्र शासनाकडूनच प्राप्त झालेला आहे. तथापि, केंद्र शासनाच्या दिनांक १२ मार्च, २०१५ च्या पत्रान्वये यापुढे या योजनेकरिता निधी प्राप्त होणार नसल्याने सदरची योजना संपुष्टात आणण्याबाबत मा. मुख्य सचिव यांच्या

अध्यक्षतेखालील उच्चधिकार समितीच्या दिनांक २२ मे, २०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आलेली आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

सदर योजनेअंतर्गतचे कर्मचारी हे कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यांच्यासोबत केंद्र शासनाच्या अटी-शर्तीनुसार तसा करारनामा करण्यात आलेला आहे.

दिनांक २२ मे, २०१५ रोजीच्या उच्चधिकार समिती बैठकीमध्ये सदर योजनेअंतर्गत कार्यरत असणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा टप्प्याटप्प्याने संपुष्टात आणण्यात याव्यात तसेच इतर प्रकल्पामध्ये त्यांच्या अनुभवानुसार त्यांच्या सेवा वापरण्यात मान्यता देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोरेगाव लघु पाटबंधारे तलावअंतर्गत उमरगा नाल्यावर कोल्हापूरी पध्दतीने बंधारे बांधणे बाबत**

**(११) २६१५३ (१७-०८-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगाव लघु पाटबंधारे तलावअंतर्गत उमरगा नाल्यावर कोल्हापूरी पध्दतीने बंधारे बांधणे बाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कुठलीची कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासन कोणती व केव्हा कार्यवाही करणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (३१-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) व (४) को.प.बंधाऱ्याचे स्वतंत्र अंदाजपत्रक क्षेत्रीय स्तरावर तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील गोठणे (ता.संगमेश्वर) व नांदगांव (ता.चिपळूण) येथे पुनर्वसन करण्यात आलेल्या गावठाणामध्ये पाणी पुरवठा होण्याबाबत**

**(१२) २६३०३ (२९-०७-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातीव (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथे पुनर्वसन करण्यात आलेल्या गोठणे पुनर्वसन गावठाणामध्ये मुलभुत सुविधा विशेषतः पाणी पुरवठा होत नसल्याने तेथील नागरीकांची प्रचंड गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील गडनदी प्रकल्पामुळे प्रस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांपैकी शासकीय पुनर्वसन झालेल्या नांदगांव (ता.चिपळूण) पुनर्वसन गावठाणामधील प्रकल्पग्रस्तांना पाणी समस्येला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत वारंवार मागणी करुनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे ग्रामस्थांकडून संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पुनर्वसित गावठाणाकरिता पाणी पुरवठा होणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत ठेव तत्वावर स्थापत्य कामे पूर्ण करण्यात आली असून, उपरोक्त योजना सुरळीतपणे सुरु आहे.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.
नांदगांव (ता.चिपळूण) गावठाणातील प्रकल्पग्रस्तांच्या पाणी पुरवठ्यासाठी स्त्रोत विहिरींचे व राईझिंगचे मेनचे काम १० वर्षापूर्वी पूर्ण झाले होते. सदर स्त्रोत विहिरीतील पाण्यावर तवंग आढळून आल्याने सदर पाणी पिण्यास ग्रामस्थ तयार नव्हते. ग्रामस्थांच्या मागणीनुसार शुध्द पिण्याचे पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने नवीन स्त्रोत विहिर व पाईप लाईन बदलून देण्याची मागणी होती. त्यानुसार नविन विहिरीचे काम पूर्ण झाले असून नवीन पाईप लाईन टाकण्याच्या कामाची निविदा प्रक्रीया प्रगतीपथावर आहे. तसेच पर्यायी तात्पुरती व्यवस्था करुन पुनर्वसन गावठाणातील प्रकल्पग्रस्तांना सद्य:स्थितीत पाणीपुरवठा चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ईसापूर (ता.पुसद जि.यवतमाळ) या धरणाच्या डाव्या कालव्याची लांबी २० कि.मी.पर्यंत वाढविण्याबाबत

**(१३) २७७०३ (१७-०८-२०१५). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ईसापूर धरणाचा डावा कालवा उमरखेड मतदार संघातून जात असून दरवर्षी उन्हाळ्यामध्ये पाणीटंचाई निर्माण होवून पैनगंगा नदीच्या पात्रात पाणी सोडण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनतेला आंदोलने करावी लागत आहेत, हे खरे आहे काय,
(२) सद्यस्थितीत असलेल्या डाव्या कालव्याची लांबी उमरखेड तालुक्यातच आदिवासी व बंजारा बहुल क्षेत्रात २० कि.मी ने वाढविण्यास शेतक-यांना व जनतेला भेडसावणा-या पाणी टंचाई पासून कायमची सुटका होईल यासाठी शासन सदर कालव्याची लांबी वाढविण्याबाबत सकारात्मक दृष्टीने प्रयत्न करणार आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१६) :**(१) पाणी टंचाई निर्माण होते हे खरे आहे. तथापि मोठ्या प्रमाणात आंदोलने करावी लागतात, हे खरे नाही.

उन्हाळ्यात निर्माण होणाऱ्या पाणी टंचाईसाठी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेमार्फत ईसापूर धरणात पिण्यासाठी पाण्याचे आरक्षण दरवर्षी करण्यात येते आणि टंचाई परिस्थितीत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या मागणीनुसार ईसापूर धरणाच्या डाव्या कालव्याद्वारे पैनगंगा नदीच्या पात्रात पाणी सोडण्यात येते.

(२) पाणी उपलब्धते अभावी ईसापूर डाव्या कालव्याची लांबी २० कि.मी. ने वाढविता येणे शक्य नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळंब तालुक्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाच्या विहीरी व गोठे यांचे हजेरीपत्रक काढण्याबाबत होत असलेली दिरंगाई**

**(१४) २८१९५ (१७-११-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब तालुक्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाच्या विहीरी व गोठे यांचे हजेरीपत्रक मागणी असतानाही काढले गेले नसल्याचा प्रकार दिनांक २० मार्च, २०१५ ते १५ एप्रिल, २०१५ या कालावधीत निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामाची मागणी असतानाही मजूर रोजगारापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणी असूनही कामाचे व मजुरांचे हजेरी पत्रक न काढण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

दिनांक २० मार्च, २०१५ ते १५ एप्रिल २०१५ या कालावधीत कळंब तालुक्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत एकूण ३५० हजेरी पत्रके काढण्यात आली आहे. तसेच या योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाच्या मागणी प्रमाणे १४३ हजेरी पत्रके काढण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दुष्काळासाठी शासनाला करावी लागलेली करवाढ

**(१५) २८६५० (१४-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गारपीट, अवकाळी पाऊस व दुष्काळामुळे शासनाच्या तिजोरीवर पडलेला ताण, महसुलात झालेली घट आर्थिक परिस्थितीचा विचार न करता केलेल्या घोषणा परिणामी राज्यावर आर्थिक संकट ओढावल्याच्या कारणास्तव राज्य शासनाने दिनांक ३० सप्टेंबर २०१५ रोजी दारु, सिगारेट, वायुमिश्रित शितपेय इत्यादींवर १६०० कोटी रुपयाची करवाढ केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने केलेल्या चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) तसेच महसूलीतील घट भरुन काढण्याकरीता अन्य पर्यायाची निवड न करता दरवाढ करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०२-२०१६) :**(१) करवाढ केली हे खरे आहे.

(२) कारवाढ केल्यानंतर शासनास माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये रु.३४४.०६ कोटी व माहे डिसेंबर, २०१५ मध्ये रु.३१५.८४ कोटी इतका वाढीव महसूल मिळाला आहे.

(३) लागू नाही.

---

## अचलपूर मतदार संघातील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गाकरिता निधी मिळण्याबाबत

**(१६) २८८८७ (१४-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर मतदारसंघातील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग करिता डी.पी.डी.सी अंतर्गत जुलै २०१५ च्या अर्थसंकल्पात ३ कोटींचा अतिरिक्त निधी मिळण्याबाबत स्थानिक विधानसभा सदस्य अचलपूर यांनी शासनास दिनांक १६ ऑगस्ट,२०१५ रोजी पत्र लिहून मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०२-२०१६) :**(१) व (२) अचलपूर मतदार संघातील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गाची दुरुस्तीसाठी जुलै, २०१५ च्या अर्थसंकल्पामध्ये रस्त्यांच्या कामासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्याबाबत श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू. विधान सभा सदस्य यांचे दि. १५/०६/२०१५ चे पत्र प्राप्त झाले आहे.

जिल्हा वार्षिक योजनेच्या निधी वाटपाचे सुत्र शासन निर्णय, नियोजन विभाग दि.१७/४/२०१० अन्वये निश्चित करण्यात आले आहे. सदर निधी वाटप सुत्रानुसार अमरावती जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) साठी सन २०१५-१६ करीता रु. २१७.९२ कोटी निधी जिल्हा वार्षिक योजना राज्यस्तर बैठकीत निश्चित करण्यात आला. संपूर्ण निधी अर्थसंकल्पित करण्यात येवून जिल्ह्यास उपलब्ध करुन देण्यात आला असल्याने अतिरिक्त निधी मंजूर करता येणार नाही. तथापि जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत एखाद्या योजनेस मागणीनुसार आवश्यक निधी पुनर्विनियोजनाने उपलब्ध करण्याचे अधिकार संबंधित जिल्हा नियोजन समितीस आहेत. त्यामुळे उपरोक्त पत्रान्वये केलेल्या मागणीस अनुसरुन जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने उचित कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, अमरावती यांना शासन पत्र दि. १५/०७/२०१५ अन्वये सुचित करण्यात आले आहे, असे शासन पत्र दि. ३/०८/२०१५ अन्वये ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, विधानसभा सदस्य यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पूर्णा (ता.चांदूर बाजार,जि.अमरावती) मध्यम प्रकल्पाकरिता तृतीय सुप्रमा मिळण्याबाबत

**(१७) २८८९६ (१४-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्णा (ता.चांदूरबाजार, जि.अमरावती) मध्यम प्रकल्प या प्रकल्पाला ५ वर्षे पूर्ण होवूनही रुपये २४१.६६ कोटींची तृतीय सुप्रमा अद्यापि न मिळाल्यामुळे लाभ क्षेत्रातील पाटचार्यांची कामे अपूर्ण राहून शेतकरी बांधवाना सिंचनाचा अपुरा लाभ मिळत असल्याने सुप्रमा देण्याबाबत स्थानिक विधानसभा सदस्य अचलपूर यांनी दिनांक ८ सप्टेंबर,२०१५ रोजी शासनास पत्र देवून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) दि.०३/१२/२०१५ रोजी मुंबई येथे संपन्न झालेल्या नियामक मंडळाचे बैठकीमध्ये पूर्णा प्रकल्पाचे रु.२५९.२६ कोटी किंमतीच्या सु.प्र.मा. प्रस्तावास नियामक मंडळाने मान्यता दिलेली आहे. कार्यवृत्तास मान्यता घेऊन सु.प्र.मा. आदेश निर्गमित करण्याचा ठराव कायम झाल्यानंतर विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे स्तरावर सुधारित प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

---

**नंदूरबार येथील प्रकाशा बुराई उपसा जलसिंचन योजनेबाबत**

**(१८) २८९३२ (१४-०१-२०१६). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रकाशा बुराई उपसा जलसिंचन योजना (ता.जि.नंदूरबार) सन १९९९ साली प्रशासकीय मंजूरी मिळाल्यानंतर या योजनेचे काम प्रगतीपथावर असून पुढील कामासाठी संबंधित विभागाने ४० कोटी रुपयांची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेतून बुराई प्रकल्पाची उंची वाढविण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते, परंतू त्यामुळे होणारे आखाडे ता. साक्री गावाचे पूनर्वसन व त्याला आखाडे गावाने पूनर्वसनास केलेला प्रचंड विरोध लक्षात घेता तसेच अमरावती प्रकल्प आणि वाडी शेवाडी प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांची मागणी पाहता सदरील १८ द.ल.घ.मी. पाण्यातून ८ दलघमी पाणी हे मालपूर (ता.शिंदखेडा) येथील अमरावती मध्यम प्रकल्पात तर १० दलघमी पाणी हे वाडी-शेवाडी प्रकल्पासाठी मंजूरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाला शासनाने मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

या योजनेचा सविस्तर अभ्यास करुन सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सुचना शासनाने दिनांक २१/८/२०१४ रोजी क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकरणी निर्णय घेणेत येईल.

(४) कार्यवाही सुरु असल्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मु. पो. चिखली खु. पो. लांजूड (ता.खामगाव) येथील मौजे पारखेड शिवारातील सांडव्याच्या जमिनीवरील अतिक्रमणाबाबत**

**(१९) २९२३७ (१८-०१-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री गजानन दामोधार मोरखडे मु. पो. चिखली खु. पो. लांजूड (ता.खामगाव) यांची शेती मौजे पारखेड शिवारात असून त्यांच्या गट क्र. १२६ आहे. या शेतीच्या बाजूला सांडवा आहे. सांडव्याच्या जमिनीवर काही लोकांनी अतिक्रमण केले असल्यामुळे अर्जदाराचा शेतात येणे जाण्याचा रस्ता बंद झाला आहे. अश्या आशयाची तक्रार मा.महसूल मंत्री यांचेकडे दि. १३ जुलै, २०१५ रोजी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षीच्या पेरणी पासून वंचित राहिल्यामुळे नुकसान भरपाई मिळावी अन्यथा आत्महत्येची परवानगी द्यावी असे निवेदन तहसीलदार खामगाव यांना वारंवार देऊनही यावर कुठल्याही प्रकारची कारवाई न झाल्याने मा.मुख्यमंत्री महोदयांना ८ ऑक्टोबर २०१५ रोजी निवेदन पाठवून आत्महत्येची परवानगी मागतली आहे, हे खरे आहे काय

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१६) :**(१) होय हे अंशतः खरे आहे.

लांजुड ल.पा.प्रकल्पाच्या सांडव्यावर काही लोकांनी अतिक्रमण केले होते. परंतु अशा आशयाची तक्रार मा.मंत्री महसूल यांच्या अभिलेख्यात आढळून आली नाही. तथापि श्री.गजानन दामोधार मोरखडे यांनी मा.मुख्यमंत्री यांना लिहिलेल्या दि.१६.०७.२०१५ च्या पत्राची प्रत जलसंपदा विभागास प्राप्त झाली आहे.

(२) होय हे, खरे आहे.

(३) होय.

चौकशी अंती लांजुड ल.पा.प्रकल्पाच्या सांडव्यात श्री.गणेश वासुदेव बोडखे रा.घाटपुरी यांनी अतिक्रमण केल्याचे, आढळून आले.

(४) उपरोल्लेखित अतिक्रमण काढुन घेण्यासाठी पाटबंधारे उपविभाग, खामगांव कार्यालय अंतर्गत तांदुळवाडी सिंचन शाखे कडून दि.१०/११/२०१५ च्या पत्रान्वये पोलीस स्टेशन, खामगांव ग्रामीण येथे संबंधितावर रितसर गुन्हे दाखल केलेला आहे. सद्य:स्थितीत सदर ठिकाणी अतिक्रमण नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या विक्रीकरासह कुठल्याही महसूल उत्पन्नात अपेक्षीत वाढ होत नसल्याबाबत**

**(२०) २९३३९ (२२-०१-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या विक्रीकरासह कुठल्याही महसूल उत्पन्नात अपेक्षीत वाढ होत नसल्याचे माहे आक्टोबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने प्राप्त परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०२-२०१६) :**(१) हे अंशतः खरे आहे.

मात्र, माहे सप्टेंबर, २०१५ अखेर मागील वर्षाच्या त्याच कालावधीतील महसूलाच्या तुलनेत सर्व कर संकलनात वृध्दी झाली आहे.

(२) प्रत्येक कर संकलन विभागाच्या उद्दिष्टपूर्तीचा नियमीत आढावा घेण्यात येत असून त्यावेळी कर प्रशासनास उद्दिष्टपूर्तीकरीता उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
(३) लागू नाही.

---

**कुही (जि.नागपूर) तालुक्यातील चिचघाट उपसा सिंचन योजनेचे काम तातडीने सुरु करण्याबाबत**

**(२१) २९४४१ (१५-०१-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुही (जि.नागपूर) तालुक्यातील चिचघाट उपसा सिंचन योजनेचे कामाचे दोनदा भूमिपूजन केले, कुही हा जिल्ह्यातील १३ व्या क्रमाकांचा तालुका अवर्षणप्रवण क्षेत्र असल्याने या तालुक्यातील १२ ते २० गावातील एक हजार हेक्टर कृषी क्षेत्र ओलिताखाली आणून कोरडवाहू क्षेत्राचा चिचघाट उपसा सिचंन योजनेच्या माध्यमातून काम करण्याबाबत शेतकऱ्यांना दाखविण्यात आलेले हरित क्रांतिचे स्वप्न संपुष्टात आले असल्याचे दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती चिचघाट उपसा सिंचन योजनेचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६) :**(१) चिचघाट उपसा सिंचन योजनेचे बांधकाम अद्याप सुरु झालेले नाही.
(२) व (३) सदर योजनेस दि. ३०/०४/२००८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त असून या प्रकल्पाच्या वनप्रस्तावास दि. ०७/०८/२०१४ अन्वये अंतिम मान्यता प्राप्त झालेली आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती अधिनियम २००५ कलम ११(च) अन्वये प्राधिकरणाची मान्यता घेणेची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टोल माफी, एलबीटी रद्द करणे, कृषी पंपाची वीज सवलत, अन्न सुरक्षा यासारख्या निर्णयामुळे राज्यावरील आर्थिक भार वाढत असल्याबाबत**

**(२२) २९६२२ (२२-०१-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपलब्ध निधीचा विचार न करता संवर्ग लोकप्रियतेसाठी केलेल्या घोषणा राज्याला आर्थिक संकटाच्या दिशेने घेऊन जाऊ शकतात असा इशारा राज्याच्याच वित्त विभागाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टोल माफी, एलबीटी रद्द करणे, कृषी पंपाची वीज सवलत, अन्न सुरक्षा यासारख्या निर्णयामुळे राज्यावरील आर्थिक भार वाढत असून, आर्थिक मंदीमुळे उत्पन्नावर मर्यादा आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात वित्तीय शिस्त आणण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०३-२०१६)** :(१), (२) व (३) राज्य शासनाने परिस्थितीनुसार वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने नियोजित खर्चाच्या बाबीच्या प्राथम्यक्रममध्ये बदल होत असतो. त्याअनुषंगाने वित्तीय व्यवस्थापन करताना अपेक्षित महसूल व खर्च यांची योग्य ती सांगड घालून राज्य शासन अपले वित्तीय नियोजन करीत आहे. राज्यात वित्तीय शिस्त आणण्याच्या दृष्टीने शासनाने खालील उपाययोजना केलेल्या आहेत.

अ. नवीन पद निर्मितीवर बंद आणली आहे.

ब. उद्योंगासाठी वीजेवरील अनुदान कमी केले आहे.

क. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी सुसंगत अशी कार्यवाही करुन सर्व व्यक्तीगत लाभार्थी योजना आधाराशी जोडून लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँकेतील खात्यात परस्पर जमा करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

ड. राज्याच्या वित्तिय स्थितीबाबत श्वेतपत्रिका प्रकाशित करण्यात आली आहे त्यातील कार्यवाहीसाठी मांडलेल्या मुद्यांवर राज्याच्या खर्चाच्या नियंत्रणासाठी, आर्थिक सामाजिक विकासासाठी संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत.

इ. सार्वजनिक प्रापण व्यवस्था पारदर्शक, किफायतशीर व कार्यक्षम होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.

ई. देशी अल्कोहोलिक मद्यावरील उत्पादन शुल्क व पुनर्रचना करण्यात आली असून याद्वारे अतिरिक्त महसूल मिळणे अपेक्षित आहे.

फ. नगर विकास विभाग, महसूल विभाग, गृह निर्माण विभाग यांना अतिरिक्त महसूल वाढीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील धरणातील गाळ जलविद्युत प्रकल्पांना अडचणीचा असल्याबाबत**

**(२३) २९८३० (१३-०१-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धरणातील गाळ जलविद्युत प्रकल्पांना जलविद्युत निर्मिती करणा-या यंत्रांमध्ये जाऊन बसल्याने त्या केंद्राच्या विद्युत निर्मिती क्षमतेवर त्याचा परिणाम होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलविद्युत असलेल्या धरणामधील गाळ काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नव्या विचारांची शासकीय यंत्रणेशी सांगड घालण्यासाठी मुख्यमंत्री इर्टनशिप उपक्रम सुरु करण्यात आल्याबाबत**

**(२४) २९९१९ (२१-०१-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नव्या विचारांची शासकीय यंत्रणेशी सांगड घालण्यासाठी मुख्यमंत्री इंटर्नशिप उपक्रम सुरु करण्यात आला असून तरुणाईच्या आशा आकांक्षाचे प्रतिबिंब शासनाच्या ध्येयधोरणात पुरेपुर उमटण्यासाठी या उपक्रमाचा उपयोग होईल असे प्रतिपादन मा.मुख्यमंत्री यांनी केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा उपक्रम कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे. राज्यातील तरुणांचा प्रशासनात सहभागी होण्याची संधी उपलब्ध व्हावी, युवकांचा उत्साह, नाविन्यपूर्ण कल्पना यांचा प्रशासनात उपयोग व्हावा आणि त्यामधून शासकीय यंत्रणेतील कामकाज त्यातील घटकांचा ताळमेळ व निर्णय प्रक्रिया यांचा तरुणांना थेट अनुभव मिळावा, त्यातून समर्षित वृत्तीने समाजसेवा करण्यासाठी प्रामाणिक, ध्येयवादी, सुजाण नागरीक तयार व्हावेत या हेतूने मुख्यमंत्री यांनी डिसेंबर, २०१४ मध्ये “मुख्यमंत्री इंटर्नशिप” कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले होते.
(२) “मख्यमंत्री इंटर्नशिप” कार्यक्रमाबाबत विविध विभागांशी विचार विनिमय करुन धोरण अंतिम होईपर्यंत प्रायोगिक तत्वावर सिडको, एमएमआरडीए, एमआयडीसी, एमकेसीएल व टाटा ट्रस्ट या सामाजिक संस्थेच्या सहकार्याने दि. २१ ऑगस्ट, २०१५ पासून ३६ विद्यार्थ्यांची निवड करुन मुख्यमंत्री इंटर्नशिप कार्यक्रमांतर्गत ११ महिन्यांसाठी पुढील कार्यालयात नेमणूक करण्यात आली आहे.

सिडको-३ एमआयडीसी-२, एमटीडीसी-२, एमएसईडीसीएल -२, मुख्यमंत्री सचिवालय-१२, (शासनाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पांना चालना देण्यासाठी सुरु केलेल्या सीएम वॉर रुम, कौशल्य विकासासंबंधी व सामाजिक क्षेत्राशी निगडीत योजनांचा अभ्यास करणे) जलसंधारण विभाग-१, अन्न व नागरी पुरवठा विभाग-१, महानगरपालिका, पुणे, नागपूर व औरंगाबाद प्रत्येकी-१ अशी एकूण-३ तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर, नाशिक, अहमदनगर, नागपूर, सोलापूर, औरंगाबाद, सातारा, अमरावती, पुणे, वर्धा, प्रत्येकी-१ अशी एकूण -१० अशी इंटर्नची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच सदर कार्यक्रम आता “मुख्यमंत्री फेलोशिप” म्हणून नियमितपणे नियोजन विभागाच्या अधिपत्याखालील अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत राबविण्याची कार्यपध्दती शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.४००/२०१४/१२, दिनांक २९ मे, २०१५ अन्वये निर्धारित करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शासकिय कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत**

**(२५) ३०३९७ (२१-०१-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकिय कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ६० वर्ष करणे तसेच पाच दिवसांचा आठवडा करण्याबाबतची मागणी शासकीय कर्मचारी /अधिकारी संघटनांनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सेवानिवृत्तीचे वय केंद्राप्रमाणे ५८ वर्षावारुन ६० वर्षे करणेबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर तपासण्यात येत आहे. तसेच केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांसाठी पाच दिवसांचा आठवडा करण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात लोकोपयोगी कामांवर झालेला खर्च वसूल करण्याकरिता वाढविलेला कर रोखण्याबाबत**

**(२६) ३१०३५ (२२-०१-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लोकोपयोगी कामांवर झालेला खर्च वसूल करण्याकरिता करवाढ केल्याचा दावा मा.वित्त मंत्री यांनी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोण-कोणती लोकोपयोगी कामे केली आहेत, याचा खुलासा करील काय,
(३) असल्यास, वाढत असलेली करवाढ रोखण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०२-२०१६) :**(१) करवाढ केली हे खरे आहे.
(२) शासनाने पीक विमा, पीक नुकसान भरपाई एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत राज्याचा हिस्सा या लोकोपयोगी कामाकरिता करवाढीपोटी जमा निधी उपलब्ध करुन दिला आहे.
(३) लागू नाही.
(४) लागू नाही.

---

**निधीच्या खर्चाचे प्रमाणपत्र वेळेत न दिल्यामुळे केंद्र शासनाकडून निधी मिळण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(२७) ३२०७२ (२२-०१-२०१६). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गृह, सार्वजनिक, आरोग्य, सामान्य प्रशासन, महसूल, पशुसंवर्धन इत्यादि विविध खात्यात विविध शासकीय योजना राबविण्यासाठी करण्यात आलेल्या १२५८ कोटी रुपये खर्चाचा हिशोब व त्यापैकी काही खर्चाची बिले तसेच खरेदी केलेले सामान गोदाममध्ये आढळून येत नसल्याने या सर्व प्रकरणाचा तपास जादा निरीक्षक नेमून, गेल्या १५ वर्षातील खर्चाची चौकशी करण्याच निर्णय मा.अर्थमंत्र्यांनी घेतल्याची बाब दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने राबवित असलेल्या अनेक योजनांना केंद्र सरकार अनुदान देत असल्याने या अनुदानापोटी मिळणाऱ्या निधीच्या खर्चाचे प्रमाणपत्र केंद्र शासनाला वेळेत पाठविले न गेल्याने, केंद्र शासनाकडून पुढील अनुदान मिळण्यास विलंब होत असल्याची बाब तपासात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सर्व प्रकरणाचा तपास सुरु करण्यात आला आहे काय, असल्यास, तपासाचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, सदर तपास पूर्ण होण्याकरिता अर्थमंत्र्यांनी कोणते निर्णय घेऊन कारवाई सुरु केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०३-२०१६) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्य शासनाला दररोज १०० कोटी तर दर महिन्याला तीन हजार कोटी रुपयांचे कर्ज घ्यावे लागत असल्याबाबत

**(२८) ३२३९५ (२२-०१-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याची वित्तीय घडी बसविण्याला अपयश आल्यामुळे राज्य शासनाला माहे जुलै, २०१५ पासून दैनंदिन खर्च भागविण्यासाठी दररोज १०० कोटी तर महिन्याला तीन हजार कोटी इतके कर्ज घ्यावे लागत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, आर्थिक घडी बसविण्यासाठी शासनाने कोणती उपायोजना आखली आहे वा आखण्यात येत आहे,

(४) असल्यास, दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ अखेर राज्यावर असलेल्या कर्जाचे स्वरुप काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०२-२०१६) :**(१) व (२) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पामध्ये रु.३०,५८१.९८ कोटी इतके निव्वळ कर्ज उभारण्याचे निश्चित केले आहे. त्यापैकी खुल्या बाजारातून रु.२८,५४१.७० कोटी इतके कर्ज उभारण्याचे प्रस्तावित असून याबबत केंद्र शासनाच्या मान्यतेने व वितीय मर्यादेत सदर कर्ज उभारण्यात येत आहे. त्यानुसार दरमहा सुमारे रु.३०००.०० कोटी इतके १० वर्ष मुदतीचे कर्ज रिझर्व्ह बँकेमार्फत खुल्या बाजारातून उभारण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) यासंदर्भात खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

अ) दि.०२.०६.२०१५ च्या शासन निर्णयान्वये वेतनावरील खर्चाची वाढ मर्यादित करण्यासाठी उपाययोजना निश्चित केली आहे.

ब) उद्योग क्षेत्रासाठी वीजेवरील अनुदान कमी केले आहे.

क) राज्याच्या वित्तीय स्थितीबाबत श्वेतपत्रिकेमध्ये मांडलेल्या मुद्यांवर कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागांना सूचना देण्यत आल्या आहेत.

ड) सर्व व्यक्तीगत लाभार्थी योजना न्यायनिवाड्याच्या आधीन आधारशी जोडून लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँकेतील खात्यात परस्पर जमा करण्याबाबत प्रयत्न सुरु आहेत.

(४) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ पर्यंत राज्य शासनाने खुल्या बाजारातून रु.१४०००.०० कोटी इतके कर्ज उभारले असून राज्यावरील एकूण संचित कर्ज रु.३०२६६५.८१ कोटी इतके आहे.

---

**कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज व आजरा तालुक्यासाठी महत्वांकाक्षी असलेल्या आंबेओहोळ धरणाचा काम अद्याप अपूर्ण असल्याबाबत**

**(२९) ३२५५९ (१५-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज व आजरा तालुक्यासाठी महत्वांकाक्षी असलेल्या आंबेओहोळ धरणास १८ वर्षापूर्वी सुरुवात करुन सदर प्रकल्प अद्याप अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करुन सिंचनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६) :**(१) होय.

(२) मुख्यत्वे पुनर्वसनाच्या प्रश्नामुळे प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले नाही.

(३) सदर प्रकल्प मा. मुख्यमंत्री यांच्या वॉररुममध्ये अंतर्भूत करण्यात आला आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या बांधकाम तसेच पुनर्वसन प्रश्नाच्या प्रगतीबाबत शासनस्तरावरुन संनियंत्रण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील किकवी धरणाचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(३०) ३२८५६ (१५-०१-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकसह मराठवाड्याच्या पाणी प्रश्नाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेलया नाशिक जिल्हयातील किकवी धरणाची सन २००९ मध्ये निविदा प्रक्रिया सुरु झाल्यावर प्रारंभी २८३ कोटीपर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणाच्या कामास तीन वर्षात निधी प्राप्त न झाल्याने सन २०१२ मध्ये या प्रकल्पाची किंमत पाचशे कोटीपर्यंत पोहचली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४-२०१५ व २०१५-१६ या दोन वर्षात या प्रकल्पाच्या कामासाठी कोणत्याच प्रकारची तरतूद न केल्याने हा प्रकल्प निधीअभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकल्पास निधी उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत व तातडीने निधी उपलब्ध करुन प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६) :**(१) होय.
(२) होय. कामाची अद्ययावत किंमत रु.५५३.९२ कोटी (सन २०१२-१३).
(३) होय. किकवी प्रकल्प हा पेयजल प्रकल्प असल्यामुळे शासन पत्र दि.३०/०८/२०१३ व दि.०३/११/२०१४ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार या प्रकल्पाचा अंतर्भाव वार्षिक योजना सन २०१४-१५ व २०१५-१६ च्या आखणीमध्ये करण्यात आलेला नाही. तथापि, सदर प्रकल्प मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे जनहित याचिका क्र.१२४/२०१४ मध्ये समाविष्ट असून त्याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिना मेहकरी प्रकल्पाच्या (ता.आष्टी, जि.बीड) सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता मिळण्याबाबत

**(३१) ३३०२७ (२०-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिना मेहकरी प्रकल्पाबाबतचा (ता.आष्टी, जि.बीड) अनुपालन अहवाल शासनास सादर करण्यात आला असून शासनाच्या विविध विभागांनी या प्रकल्पाबाबत काढलेल्या त्रुटींची पूर्तता शासनाकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाची सुमारे १५ कोटी ४४ लक्ष एवढी रक्कम महामंडळाकडे शिल्लक असून सदर प्रकल्पाच्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता न मिळाल्याने प्रकल्पाचे काम सन २०१० पासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाच्या पूर्ततेमुळे आष्टी तालुक्यातील दुष्काळजन्य परिस्थितीवर मात करणे शक्य असल्याने सदर प्रकल्पाच्या सुधारित अंदाजपत्रकास प्राधान्याने व तातडीने मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, उक्त प्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६) :**(१) होय.
(२) सिना मेहकरी प्रकल्पास सन २०१० पासून रु. ३९.५० कोटी निधी उपलब्ध झालेला आहे त्यापैकी आतापर्यंत झालेला खर्च रु ३०.८७ कोटी आहे.

शासनाने दि. ०६-११-२०१५ रोजीच्या निर्णयान्वये या प्रकल्पास सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात उपलब्ध तरतूदीच्या मर्यादेत मंजूर प्रमा./सुप्रमा. किंमतीपेक्षा वाढीव करावयाच्या खर्चास मान्यता दिली आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) शासनाने दिनांक ०९-०९-२०१५ च्या निर्णयान्वये मराठवाड्यातील बीड व उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रकल्पांना सुप्रमा देण्याचे अधिकार संबंधित महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास दिले आहेत.

सदर प्रकल्पाचे सुप्रमा साठीचे अंदाजपत्रक शासन निर्णय दि. ०९-०९-२०१५ मधील तरतूदीनुसार तयार करणेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोलीसह सेनगाव, औढा, नागनाथ तालुक्यात मानव विकास मिशन अंतर्गत करावयाच्या योजनांना निधी देण्याबाबत

**(३२) ३३०७६ (२०-०१-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोलीसह सेनगाव, औढा, नागनाथ तालुक्यात मानव विकास मिशन अंतर्गत राबवावयाच्या योजनेला पुरेसा निधी मिळत नसल्याने सदर योजना पूर्ण क्षमतेने चालत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मानव विकास योजनेअंतर्गत करावयाच्या योजनांना पुरेसा निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०२-२०१६) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ब्रम्हगव्हाण जलसिंचन (ता.पैठण,जि.औरंगाबाद) योजनेसाठी जमिनी संपादित केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याबाबत

**(३३) ३३२२२ (२०-०१-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ब्रम्हगव्हाण जलसिंचन (ता.पैठण,जि.औरंगाबाद) योजनेसाठी जमीन दिल्यानंतर सहा वर्षाचा कालावधी लोटला तरी शेतीसाठी पाणी व मोबदला मिळालेला नाही त्यामुळे येथील शेतक-यांनी या योजनेसाठी खोदलेली कालवे माती टाकून बुजविण्यास सुरुवात केली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील शेतक-यांना शेतीसाठी पाणी व त्यांच्या संपादित जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजनेची अद्यावत किंमत रु.५२१.१३ कोटी इतकी असून योजना पूर्णत्वासाठी भूसंपदानाच्या नवीन वाढीव दरामुळे व अपेक्षित भाववाढ लक्षत घेता रु.४१०.६७ कोटी निधीची आवश्यकता आहे. उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार भुसंपदान व कामाचे नियोजन करण्यात येत आहे.

संपादन करावयाच्या जमिनीच्या क्षेत्राविषयी शेतकरी व भुसंपदान संस्था यांच्यात एकमत न झाल्याने जमिनीचा मोबदला देता आला नाही. तथापि, संमती पत्राद्वारे जमीन ताब्यात घेऊन १३ गावातील ११२.९० हे. क्षेत्रासाठी रु.७३.२० लक्ष भूभाड्यापोटी आगावू रक्कम शेतकऱ्यांना सन २०13 मध्ये देण्यात आली आहे. तसेच मार्च, २०१५ पर्यंतच्या कालावधीचे रु.५५.१० लक्ष भूभाड्यापोटी आगावू रक्कम देण्याचे सन २०१५-१६ मध्ये नियोजित आहे.

(३) उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार भुसंपादन व कामाचे नियोजन करण्यात येत आहे.

---

## अबकारी कराच्या माध्यमातून राज्याच्या महसुलात वाढ करण्यासाठी महसूल विभागाने अर्थ विभागाकडे सादर केलेला प्रस्ताव अर्थ विभागाकडे निर्णयाकरिता प्रलंबित असल्याबाबत

**(३४) ३४३७२ (२०-०१-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अबकारी कराच्या माध्यमातून राज्याच्या महसुलात वाढ करण्यासाठी महसूल विभागाने अर्थ विभागाकडे सादर केलेला प्रस्ताव गेल्या आठ महिन्यांपासून अर्थ विभागाकडे निर्णयाकरिता प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातल्या तिजोरीत भर टाकण्याकरिता अबकारी विभागाचा महसूल वाढण्यासाठी महसूल विभागाने सुचविलेल्या उपाययोजनाबाबत तातडीने निर्णय घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विभागीय अनुशेष करण्यासाठी डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशीवर घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत

**(३५) ३५००० (२०-०१-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विभागीय अनुशेष करण्यासाठी डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशीवर अंमलबजावणी करण्यासाठी दर बुधवारी बैठक घेण्याचा निर्णय मा.अर्थ मंत्री यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मंत्रालयात झालेल्या बैठकीत जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत अशा किती बैठका झाल्या आहेत,

(३) असल्यास, त्यामध्ये कोणकोणते निर्णय घेण्यात आले आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०३-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे. मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत मा. अध्यक्षांनी समितीच्या अहवालातील शिफारशी व त्यासंदर्भात प्रशासकीय विभागांचे अभिप्राय यांचा सर्वकष अभ्यास करावयाचा असल्याने त्यासाठी दर आठवड्यात बुधवारी (सुटीचा दिवस वगळून) मंत्रिमंडळ उप समितीची २ प्रशासकीय विभागांसह बैठक आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) व (३) यानुषंगाने, मंत्रिमंडळ उप समितीच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ रोजी आयोजित बैठकीत “शालेय शिक्षण व क्रीडा” आणि “उच्च व तंत्र शिक्षण” विभागाने मंत्रिमंडळ उप समितीसमोर समतोल प्रादेशिक विकास उच्चस्तरीय समितीच्या शिफारशींवर नोंदविण्यात आलेल्या अभिप्रायांबाबत सादरीकरण केले आहे.

---

## जलसंपदा विभागातील १०० कोटी व त्यावरील रकमेच्या नवीन कामाकरिता मागविलेल्या निविदांमध्ये त्रुटी असल्याच्या तक्रारी आल्याबाबत

**(३६) ३५०९० (१५-०१-२०१६). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागातील १०० कोटी व त्यावरील रकमेच्या नवीन कामाकरिता मागविलेल्या निविदांमध्ये त्रुटी असल्याच्या तक्रारी आल्यामुळे १२८ नवीन प्रकल्पांच्या निविदा शासनाने रद्द केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १२८ नवीन प्रकल्पांच्या रद्द केलेल्या निविदांपैकी शासनाने ६८ प्रकल्पांकरिता नवीन निविदा मागविण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प कोणते आहेत व त्या प्रकल्पांच्या कामाच्या खर्चाची रक्कम किती आहे, तसेच १२८ पैकी उर्वरित ६० नवीन प्रकल्पांच्या निविदाबाबत सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६)** :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निळवंडे धरण (ता.अकोला, जि.अहमदनगर) चे वितरकांचे काम पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(३७) ३५७४८ (१४-०१-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निळवंडे धरण (ता.अकोला, जि.अहमदनगर) येथील धरणाचे काम पूर्ण झाले असून त्यात पाणीसाठा होण्यास देखील सुरवात झाली आहे. परंतु धरणाच्या वितरीकांची कामे अपूर्ण असल्याने सिन्नर (जि.नाशिक) मतदार संघातील ६ गावांतील लाभधारकांना त्याचा लाभ होत नसून सदर वितारीकांचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ०५ एप्रिल,२०१५ रोजी मा.वित्तमंत्री यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०३-२०१६) :**(१) होय.

(२) निळवंडे धरणाचे काम पूर्ण झाले असून, कालवे व वितरण व्यवस्थेची कामे प्रगतीपथावर आहेत. सन २०१५-१६ मध्ये आर्थोपायाची स्थिती व मा. राज्यपालांच्या निदेशानुसार निळवंडे धरणाच्या कालव्यासाठी रु. ३३ कोटीची तरतुद करण्यात आली आहे.प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शहरी भागामध्ये वाढत्या गुन्हेगारीबाबत प्रतिबंध करण्यासाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बसविण्याबाबत

**(३८) ३५७८१ (१४-०१-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी भागामध्ये वाढत्या गुन्हेगारीबाबत प्रतिबंध करण्यासाठी स्थानिक आमदार निधीमधून सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बसविण्याबाबत शासनाची मान्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागामध्ये गुन्हेगारीला आळा घालण्याकरीता स्थानकि आमदार निधीमधून सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबत शासनाची मान्यता नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरी व ग्रामीण भागामध्ये स्थानिक आमदार निधीमधून सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबत भेदभाव असण्याची कारणे काय आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०३-२०१६)** :(१), (२), (३) व (४) शासन निर्णय नियोजन विभाग क्र.स्थाविका-१०११/प्र.क्र.४७/का-१४८२, दि.१३.९.२०११, अन्वये, आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत, नागरी क्षेत्रांमध्ये रु. १५.०० लक्ष इतक्या आर्थिक मर्यादेत , सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे ही बाब अनुज्ञेय करण्यात आली आहे ग्रामीण भागासाठी सदर तरतूद करण्यात आली आहे. याबाबतचे धोरण गृह विभागाकडून निश्चित करण्यात येणार असून, त्या धोरणानुसार पुढील आदेश होईपर्यंत आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत, सी.सी.टी.व्ही. बसविणे या कामांना मंजुरी देण्यात येऊ नये, अशा सुचना, नियोजन विभाग पत्र क्र. स्थाविका-२०१२/प्र.क्र.३६/का.१४८२, दि. २६.३.२०१२ अन्वये देण्यात आलेल्या आहेत. गृह विभागाचे धोरण अद्याप निश्चित झालेले नाही.

---

**म्हैसाळ (जि.सांगली) योजनेच्या थकीत पाणीपट्टी वसुलीकरिता**
**शेतक-यांच्या सातबारावर पाणीपट्टीत होणारी वाढ**

**(३९) ३५९४५ (२१-१२-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हैसाळ (जि.सांगली) योजनेच्या थकीत पाणीपट्टी वसुलीसाठी सत्तर हजार शेतकऱ्यांच्या सातबारावर पाणी पट्टीत वाढ होणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर किती शेतकऱ्यांच्या सातबारावर पाणी पट्टीत वाढ झाली आहे,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६)** :(१) म्हैसाळ प्रकल्पांची सन २००२-०३ पासून थकीत पाणीपट्टीची रक्कम भरण्यास शेतकऱ्यांकडून प्रतिसाद नसलेमुळे पाटबंधारे अधिनियम १९७६ मधील कलम ८८/(२) च्या तरतूदीनुसार साधारणपणे २० हजार शेतकऱ्यांच्या ७/१२ वर थकीत पाणीपट्टीची नोंद घेणे बाबत कार्यवाही चालु आहे.

(२) व (३) १३ गावातील ५६४३ शेतकऱ्यांचे ७/१२ वर नोंद घेणेत आली आहे. उर्वरित गावातील लाभधारक शेतकऱ्याच्या ७/१२ वर थकीत पाणीपट्टीची नोंद घेण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाने काही वस्तुंवरील करांच्या दरात वाढ केल्याबाबत**

**(४०) ३६०२४ (२०-०१-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने काही वस्तुवरील करांच्या दरात वाढ केल्याचे दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दरवाढ करण्याची कारणे काय आहेत,
(३) सदर दरवाढीचे स्वरुप काय आहे आणि या दरवाढीमुळे राज्य शासनाला अंदाजे किती अतिरिक्त रक्कम प्राप्त होणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) पीक नुकसान भरपाई, पीक विमा, टोलमुक्ती, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाचा राज्य हिस्सा या विविध कारणाकरिता आवश्यक निधी उपलब्ध नसल्यामुळे सदर दरवाढ करण्यात आली.
(३) पेट्रोल व डिझेलवर प्रतिलिटर २ रुपये, सोने, चांदी व त्याचे दागिने ०.२% विदेशी व देशी मद्य ५%, वायूमिश्रीत पेये ५% सिगारेट १०% वाढ करण्यात आली आहे.
या दरवाढीमुळे राज्य शासनास सन २०१५-१६ वर्षात अंदाजे रु.१६५५ कोटी अतिरिक्त रक्कम प्राप्त होणार आहे.

---

**जलसंपदा विभागाच्या अलोरे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) वसाहतीतील पोलीस मैदान, व्यायामशाळा,बगीचे,रस्ते यांची झालेली दुरवस्था**

**(४१) ३६४८८ (२०-०१-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलसंपदा विभागाचे अलोरे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील शासकीय वसाहतीमध्ये असणारे पोलीस मैदान, व्यायामशाळा, बगीचे, अंतर्गत रस्ते आदींच्या देखभाल - दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे त्यांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबधीत प्रकल्पाचे काम संपल्याने सदर कामांना निधी मिळत नसल्यामुळे त्यांचे दुरुस्ती व व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचे पोलीस मैदान, व्यायामशाळा, बगीचे, काही अंतर्गत रस्ते यांची दुरवस्था टाळण्याच्या दृष्टीने स्थानिक ग्रामपंचायत अलोरे (ता.चिपळूण) यांनी सदरची मालमत्ता ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तदनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) व (४) पोलीस मैदान, व्यायामशाळा, बगीचे अंतर्गत रस्ते इत्यादी ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करण्याची मागणी, सरपंच, ग्रामपंचायत, अलोरे यांनी दिनांक ७/१०/२०१५ च्या पत्रान्वये केली होती. अलोरे वसाहतीमधील खेळाचे मैदान, व्यायामशाळा, बाग या सुविधा

केवळ प्रकल्पाचे अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता आहेत. जोपर्यंत प्रकल्प आस्थापना अलोरे येथे कार्यरत आहे तोपर्यंत भविष्यातही सदर सुविधांची आवश्यकता राहणार आहे. सद्यस्थितीत सुविधां बाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची कोणतीही तक्रार नाही. सबब ही जागा ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मापेगाव (ता.परतुर, जि.जालना) येथे स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेने शेतकऱ्यांचे कर्ज पुनर्गठण करण्यास विलंब केल्याबाबत**

**(४२) ३६५०३ (१४-०१-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मापेगाव (ता.परतुर, जि.जालना) येथील शेतक-यांचे स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेने कर्ज पुनर्गठण करण्यास टाळाटाळ केल्याने शेतकऱ्याने विषारी औषध सेवन करुन आत्महत्या केली,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधीत बँक व्यवस्थापकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०३-२०१६) :**(१) नाही.
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना व जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, जालना यांच्या प्राप्त अहवालानुसार परतुर तालुक्यातील मापेगाव खुर्द येथील श्री.ज्ञानोबा आश्रोबा काकडे यांना दिनांक २६.०९.२०१४ रोजी रु. ५३,०००/- व त्यांच्या पत्नी श्रीमती कुशीवर्ता ज्ञानोबा काकडे यांना दिनांक २६.०२.२०१४ रोजी रु. ७५,०००/- असे एकूण रु. १,२८,०००/- कर्ज दिले आहे. श्री.ज्ञानोबा काकडे यांनी दिनांक ३०.०९.२०१५ रोजी आत्महत्या केली असून त्यांच्या मृत्यूचे कारण पीक कर्ज पुनर्गठन नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील डोंगरी विकास कार्यक्रम, स्थानिक विकास कार्यक्रम, जिल्हा वार्षिक योजना आदी कार्यक्रमांतर्गत मंजूर निधी वापराविना पडून असल्याबाबत**

**(४३) ३६५८६ (१४-०१-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील सन २०१२-१३, २०१३-१४ या आर्थिक वर्षात डोंगरी विकास कार्यक्रम, स्थानिक विकास कार्यक्रम, जिल्हा वार्षिक योजना आदी कार्यक्रमांतर्गत मंजूर निधीपैकी सुमारे १.५६ कोटी चा निधी अखर्चीत राहिल्यामुळे शासनाकडे परत गेला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, दरम्यानच्या काळात खनिज उत्खननास असलेल्या बंदीमुळे बांधकाम साहित्य वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे कामे पूर्ण होण्यास विलंब झाला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्यस्थितीत सदरची कामे पूर्ण झालेली असल्यामुळे समर्पित झालेला निधी परत मिळण्याबाबत जिल्हा नियोजन समिती,रत्नागिरी यांचे कडून वित्त विभागाकडे वारंवार मागणी करूनही अद्याप सदर अखर्चीत निधी परत मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कामे पूर्ण करूनही कामाची देयके प्रलंबित असल्यामुळे संबधीत ठेकेदार / संस्था आर्थिक अडचणीत सापडलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, तदनुषंगाने सदरचा निधी परत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

रत्नागिरी जिल्ह्यामध्ये सन २०१०-११ ते २०१३-१४ या आर्थिक वर्षात डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत अखर्चित निधी रु. ९१.६८ लक्षापैकी रु. १.५२ लक्ष अखर्चित निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली असून उर्वरित रु. ९०.१६ लक्ष इतक्या रकमेच्या अखर्चित निधीस मान्यता देण्याच्या प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन असून प्रस्तावातील त्रुटीची पुर्तता करण्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना कळविण्यात आले आहे. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१०-११ ते सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातील रु. ७४.७१ लक्ष अखर्चित निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे व सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मंजूर निधीपैकी रु. १८९.५४ लक्ष अखर्चित निधी खर्च करण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे विचाराधीन असून प्रस्तावातील त्रुटीची पुर्तता करण्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना कळविण्यात आले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटण (जि.सातारा) तालुक्यात कृष्णा खोरे विकास महामंडळातंर्गत पुर्ण झालेल्या उत्तरमांड धरणप्रकल्पातील मौजे माथणेवाडी येथील ४४ कुटुंबाचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(४४) ३६७८७ (१४-०१-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यात कृष्णा खोरे विकास महामंडळाअंतर्गत उत्तरमांड धरण प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाच्या डाव्या बाजूस मौजे माथणेवाडी हे गांव वसले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणात होणाऱ्या पाणीसाठयामुळे या गांवातील सुमारे ४४ कुंटूंबांना या पाण्याचा धोका निर्माण होत असून धरणातील पाणी या ४४ कुंटुंबाच्या घरांना लागत असल्याने या ४४ कुंटुंबाचे पुनर्वसन करण्याबाबत या कुटुंबांनी राज्य शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या ४४ कुटुंबाचे तातडीने पुनर्वसन करणे गरजेचे असल्याचा अहवाल सातारा पाटबंधारे विभागाने राज्य शासनाकडे सादर केला असून या कुटुंबाची ही मागणी अनेक वर्षापासून राज्य शासनाकडे प्रलंबित असून या गावातील बाधिक ४४ कुटुंबांनी सातत्याने पाठपुरावा करुनही त्यांचे पुनर्वसन केले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या ४४ कुटुंबांच्या पुनर्वसनासंबंधी राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, अद्याप यासंदर्भात निर्णय घेतला नसल्यास निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६)** :(१) होय.

(२) होय.

(३) ते (५) मौजे माथणेवाडी या अंशत: बाधीत गावाचा खास बाब म्हणून पुनर्वसनाबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे यांचेमार्फत दिनांक ६/१२/२०१२ रोजी मदत व पुनर्वसन विभागास सादर आहे. सदर प्रस्तावावरील मदत व पुनर्वसन विभागाकडील अभिप्रायांबाबत क्षेत्रिय स्तरावर पूर्तता करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

या प्रकरणी दिनांक २९/७/२०१५ रोजी मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत उत्तरमांड प्रकल्पाच्या पूर्ण संचय पातळीमध्ये प्रत्यक्ष किती घरे बाधीत होत आहेत याची पडताळणी जिल्हाधिकारी, सातारा यांचे स्तरावर करणेत येऊन सविस्तर अहवाल सादर करणेबाबत मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांनी सूचित केले आहे. पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

**महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८२ ची जुनी पेंशन योजना लागू करण्याबाबत**

**(४५) ३६७९२ (१४-०१-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने दिनांक ३१ ऑक्टोंबर, २००५ रोजी घेतलेल्या शासन निर्णयाने दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर शासकीय सेवेत रुजू झालेल्या सर्व सेवकांना मुळची नागरी सेवा पेंशन योजना बंद करुन नवीन परिभाषिक अंशदान निवृत्ती योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची योजना रद्द करुन सेवा निवृत्ती वेतन १९८२ ची जुनी पेंशन योजना लागू करण्याबाबत दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पासून शासकीय सेवेत रुजू झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांकडून मोठया प्रमाणात मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) दरम्यान शासनाने वित्त विभागाच्या दिनांक १९ जुलै, २०११ च्या शासन निर्णयानुसार दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची सेवा पुर्ण झाली अशांना जुनी पेंशन योजना लागू केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ नंतर शासकीय सेवेत रुजू झालेल्या सर्व शासकीय कर्मचाऱ्यांवर लादलेली ही योजना बंद करुन जुनी पेशंन योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) अशी मागणी कर्मचारी संघटनांकडून करण्यात येत आहे.
(३) दि. ०१.११.२०१५ पुर्वी करार पध्दतीने मानधनावर नियुक्त होवून दि. ०१.०१.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियमित झालेल्या शिक्षण/कृषी सेचक/ग्रामसेवक यांना दि. १९ जुलै, २०११ च्या शासन निर्णयान्वये जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्यास आली आहे.
(४) नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेसाठी राज्य शासन केंद्र शासनास सामिल झाले असून त्याअंतर्गत जमा असलेली रक्कम केंद्रीय अभिलेख देखभाल प्राधिकरणांकडे जमा करण्यात आली असल्याने दि. ०१ नोव्हेंबर, २००५ नंतर शासकीय सेवेत रुजु झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे उचित होणार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोर्डी नाला प्रकल्पाची (ता.चांदुरबाजार, जि.अमरावती) कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(४६) ३६८२९ (२०-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील बोर्डी नाला प्रकल्पाच्या १०६.०२ हे जमिनीचे भुसंपादनाची कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाची कामे सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६) :**(१) बोर्डी नाला प्रकलपाच्या धरण कामासाठी ५५३.३२ हे. जमीन सरळ खरेदीने, तर ९९.४६ हे. जमीन भूसंपदान प्रक्रियेद्वारे ताब्यात घेण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या कालवे कामासाठी ९७ हे. जमिनीची आवश्यकता असून ती ताब्यात मिळविण्यासाठी आवश्यक प्रयत्न सुरु आहेत.
(२) प्रकल्पाची कामे सुरु आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटण (जि.सातारा) तालुक्यात कृष्णा खोरे विकास महामंडळातंर्गत पुर्ण झालेल्या उत्तरमांड धरण प्रकल्पातील पाणी धरणाच्या पश्चिमेकडील डाव्या उजव्या तीरावरील गांवाना देण्याबाबत**

**(४७) ३६८५३ (२२-०१-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यात कृष्णा खारे विकास महामंडळातंर्गत उत्तरमांड धरण प्रकल्पाचे काम पुर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणातील पाणी हे पुर्वेकडील कमी गांवानाच मिळणार असुन धरणासाठी त्याग केलेली पश्चिमेकडील अनेक गांवे या धरणातील पाण्यापासून वंचीत राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणाच्या पश्चिमेकडील डाव्या व उजव्या तीरावर बसलेल्या अनेक गांवातील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतीला शासन खर्चाने लिफ्ट इरिगेशन योजना करुन १०० टक्के शेतीला पाणी देण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेवून उत्तरमांड धरण प्रकल्पाच्या पश्चिमेकडील गांवाना शासन खर्चाने पाणी देण्याबाबत तालुक्याचा पश्चिमेकडील गांवाना शासन खर्चाने पाणी देण्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक ०८ मार्च, २०१५ रोजी मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंबंधी राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(६) अद्यापही यासंदर्भात निर्णय घेतला नसल्यास निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६) :**(१) होय.

(२) नाही.

(३) व (४) होय.

(५) उत्तरमांड प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून, या प्रकल्प अहवालात उपसा सिंचन योजनेची तरतुद नाही. या प्रकल्पाचे मंजूर एकूण लाभक्षेत्र ६६६७.०७ हे. (सिंचन क्षेत्र ४८०० हे) इतके आहे. त्यानुसार प्रकल्पाच्या पश्चिमेकडील डाव्या उजव्या तीरावरील गावांना म्हणजेच जलसाठ्याच्या वरील बाजूस असलेल्या २६७.३३ हे. सिंचनाखालील क्षेत्राचा (सर्वसाधारण ६% क्षेत्र) प्रकल्पाचे लाभक्षेत्रात समावेश आहे. शासनाच्या दिनांक २१/११/२००२ च्या निर्णयानुसार धरणजलाशयातून प्रकल्पित सिंचन क्षेत्राच्या एक टक्केपर्यंत उपसा सिंचनासाठी व १४ टक्के पर्यंत ठिबक/तुषारद्वारे सिंचनासाठी अशी एकूण १५ टक्के प्रकल्पिय पिक रचनेच्या क्षेत्रानुसार मंजूरी देता येते. त्यानुसार उपसा सिंचनाद्वारे ४८ हे तर ठिबक/तुषारद्वारे ६७२ हे (पीक क्षेत्र) पर्यंत मागणी आल्यास मंजूरी देता येईल.

शेतकऱ्यांनी उपसासाठी मागणी अर्ज केल्यानुसार धरणाच्या पश्चिमेकडील डाव्या व उजव्या तीरावरील गावांना ८८.४५ हे. क्षेत्रावर सिंचन परवाने मागणी मंजूर करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील वैनगंगा नदीवर असलेला सिंचन प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४८) ३७९८० (२०-०१-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात चीचडोह, वाघोली उपसा सिंचन, मुल्लूर, कोटगल, कळगाव, येनबांधला, ई ब्यारेज हे सिंचन प्रकल्प वैनगंगा नदीवर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे जिल्ह्यातील असंख्य शेतकरी व उद्योगांना सिंचनाची सोय उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंचन प्रकल्प पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, वैनगंगा नदीवरील गडचिरोली जिल्यात प्रस्तावित असलेल्या बॅरेजमुळे व त्यावरील उसियो द्वारे गडचिरोली जिल्ह्यात २५७०९ हेक्टर ओलीत क्षेत्रास लाभ मिळणार आहे. तसेच या बॅरेजेसचे नियोजनात बिगर सिंचनाकरिता १९५.८१३ दलघमी तरतूद असून यातून पिण्याचे पाणी व औद्योगिक वापर होणार आहे.

(३) वैनगंगा नदीवर प्रस्तावित गडचिरोली जिल्ह्यातील ५ बॅरेजपैकी चिचडोह बॅरेज हे बांधकामाधीन आहे. कोटगल बॅरेजला प्रशासकीय मान्यता प्रदान करणेत आली आहे. कळमगांव बॅरेजचा सविस्तर प्रकल्प अहवाल राज्य तांत्रीक सल्लागार समितीचे अनुपालनाधीन आहे. उर्वरीत मुल्लूर बॅरेज व येनबोथला बॅरेज हे अन्वेषणाधीन आहेत. तसेच चिचडोह बॅरेजचे पाणी साठ्यावरील वाघोली बुटी उपसा सिंचन योजनेचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबाबारी (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) येथील देहली सिंचन प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या गावांच्या पुनर्वसनाबाबत**

**(४९) ३९१११ (२०-०१-२०१६). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबाबारी (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) येथील देहली सिंचन प्रकल्पाची सद्य:स्थिती काय आहे,

(२) असल्यास, सदर प्रकल्पामुळे त्या परिसरातील किती गावे विस्थापित होणार आहे,

(३) असल्यास, विस्थापित होणाऱ्या गावांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६) :**(१) सद्यस्थितीत देहली प्रकल्पाचे काम खालीलप्रमाणे पुर्ण झालेले आहे.

१. मातीधरण-६५%

२. सांडवा बांधकाम- १००%

३. विमोचकाचे काम- १००%

४. डावा कालवा कि.मी. १ ते ११.४० पैकी कि.मी १ ते ८ मधील मातीकाम पूर्ण कालव्यावरील बांधकामे प्रगतीत.

धरणाचे काम प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे बंद आहे.

(२) देहली प्रकल्पामुळे आंबाबारी हे एक गांव विस्थापित होणार आहे.

(३) सदर गावाचे पुनर्वसन करण्यासाठी रायसिंगपूर गट नं. १७, अंबाबारी गट नं. ४७, जुना नागरमुथा व भोयर येथील जमिनी संपादीत करण्यात आल्या असून नागरी सुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत. देय असलेल्या एकूण नागरी सुविधांपैकी पाच नागरी सुविधांची कामे पुर्ण झालेली आहेत.

बाधित गावातील ६८९ घरांचे पुनर्वसन करण्याचे नियोजन असून ३४० कुटुंबाचे स्थलांतर पुनर्वसित गावठाणात झालेले आहे. उर्वरित बाधितांच्या स्थालांतराची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंजूर अनुदानापेक्षा अधिक खर्च करण्याच्या प्रकारावर आळा घालण्याबाबत**

**(५०) ३९२५४ (२०-०१-२०१६). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात विविध विभागांना मंजूर झालेल्या निधीतूनच खर्च वेळेत करावा तसेच मंजूर निधीपेक्षा अधिक खर्च करुन वित्तीय अनियमितता निर्माण करु नये व पुरवणी मागण्या सादर करण्याची वेळ शासनावर आणू देऊ नये इ. बाबीसंबंधी विशेष परिपत्रक काढून संबंधित विभागाच्या सचिवांना व अन्य अधिका-यांना आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त आदेशानुसार त्याबाबतची अमंलबजावणी न करणा-या संबंधीत विभागीय अधिका-याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) मंजूर अनुदानापेक्षा अधिक खर्च करण्याचे प्रकार किती विभागात आढळून आले व त्याबाबत कोणती कारवाई करण्यात येत आहे,

(४) उपरोक्त कारवाईमुळे परिस्थिती नुसार अतिरिक्त मागण्या मांडण्याचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०२-२०१६)** :(१) निधीचा विनियोग योग्या रितीने होऊन खर्चाचे पूर्ण वर्षाचे योग्य पध्दतीने नियोजन करण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत मार्च महिन्यातच खर्च करण्याची पध्दत टाळणे, खर्च योग्य पध्दतीने होणे, अनावश्यक खर्चावर नियंत्रण रहणे तसेच भविष्यात अर्थसंकल्पीय अनियमितता होऊ नये. असे सर्व विभागांना मा.मंत्री (वित्त) यांच्या दि.२१.७.२०१५ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(२), (३) व (४) अर्थसंकल्पीय निधीचे वितरण सर्व विभागांना अर्थसंकल्प अंदाज वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (BEAMS) उपलब्ध करुन देण्यात येते. मासिक निधी विवरणपत्र बीम्सवर सादर केलयानंतरच निधी सदर प्रणालीवरच वितरीत करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत व त्याप्रमाणे निधीचे वितरण करण्यात येते. मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होण्याची शक्यता निर्माण झाल्यास व तो खर्च अपरिहार्य असल्यास त्यास वित्त विभागाची पूर्व परवानगी घेण्यात यावी व मंजूर किंवा सुधारित अनुदानात खर्च न भागविल्यास नियंत्रण अधिकाऱ्यास जबाबदार धरण्यात येईल व अनियमिततेचा प्रकारानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाहीस संबंधित अधिकारी पात्र होतील, असे वित्त विभागाकडून प्रशासकीय विभागांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.